आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

# आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,कुळगाव.

## G20 अंतर्गत Civil 20 (C20) परिसंवाद

दिनांक: ०६ मे २०२३, शनिवार रोजी विवेकानंद केंद्र कन्याकुमारी, शाखा बदलापूर आणि आदर्श महाविद्यालय बदलापूर आयोजित G20 अंतर्गत Civil 20 (C20) परिसंवाद आदर्श महाविद्यालयाच्या ऑडिटोरियममधे उत्साहात संपन्न झाला. परिसंवादाची सुरुवात तीन ओंकार व प्रार्थनेने झाली. त्यानंतर " निर्माणोंके पावन युग में हम चरित्र निर्माण न भुले।" हे समर्पक गीत झाले. तत्त्वज्ञानाच्या गाढ्या अभ्यासक मा. शुभदाताई जोशींनी आपल्या बीज भाषणात सांगितले की,"समाजावर संस्कार करणे आवश्यक आहे, ते काम सामाजिक संस्था करतात.

सामाजिक संस्था व त्यांचे कार्य प्राचीन काळापासून भारतात सुरू आहे. वेदकाळापासून हे आपल्याला दिसून येते. राजसत्तेवरही त्यांचा प्रभाव असायचा. या संस्था सरकारवर अवलंबून नाहीत. माणसाचा जन्म हा देण्यासाठी आहे, हा संस्कार नवीन पिढीला देणे गरजेचे. ऋण संकल्पना ही एक महत्त्वाची भारतीय संकल्पना आहे. दिल्याने ऋण फिटते. यासाठी जबाबदार नागरिक बनणे आणि बनवणे आवश्यक आहे. हेच अनेक शतके सुरू आहे. You are the light. प्रत्येकात आत्मतेज आहे, सामर्थ्य आहे. ते ओळखले पाहिजे. समाज उभा करणे हे सगळयांचे काम आहे." प्रत्यक्ष कार्यक्रमात २७ संस्थानी सहभाग घेतला होता.

पर्यावरण क्षेत्रातकाम करणारे, भटक्या व जखमी प्राण्यांसाठी काम करणारे, गतीमंद / मतिमंद / दिव्यांग मुलांसाठी, निराधार बालकं व वृद्धांसाठी अशा विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्थाच्या ६० हून अधिक सभासदांची उपस्थिती होती.जवळपास सगळयाच संस्थाचे कार्याचा आढावा घेणारे Video दाखवण्यात आले. कुणी स्वतःवर आलेल्या प्रसंगातून तर कुणी सामाजिक बांधिलकीतून सुरु केलेल्या संस्थांचा प्रवास खडतर आणि हेलावून टाकणारा आहे. आर्थिक अडचणी, मनुष्यबळ व इतर साधनांची कमतरता यावर मातकरत अव्याहतपणे कार्यरत रहाणे हे खूप कठीण काम आहे. समाजसेवेच्या ध्येयाने प्रेरित होऊन काम करणाऱ्या या संस्थाच्या संस्थापकांचे व कार्यकर्त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच.

G20 समुहाकडे अनेकांनी केलेल्या मागणीत आर्थिक मदतीचे आवाहन केले आहे पण तो त्यांचा - संस्था अधिक सक्षमपणे चालवण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. अनाथ बालकं किंवा १८ वर्षावरील अनाथ मुलं / मुलींचे शिक्षण, संगोपन, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केले जाणारे प्रयत्न, दिव्यांग, निराधार वृद्ध, गतिमंद किंवा मतिमंद मुले व प्रौढ व्यक्तींसाठी त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी व्यापक प्रयत्न व्हायला हवेत त्यासाठी शक्य असल्यास समिती स्थापन होऊन संबंधित व्यक्तीच्या कुटुंबाशी किंवा संस्थांबरोबर संवाद साधून / काम करून प्रयत्न करायला हवेत. त्याच बरोबर या सगळयाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी, त्यांना साहाय्य करण्यासाठी समाजाचे प्रबोधन हि करायला हवे असे या परिसंवादाचे प्रयोजन व फलित असावे असे वाटते.

मा. अरुणजी करमरकर यांनी कार्यक्रमाचा समारोप करतांना पुढील विचार व्यक्त केले. "आज ही एक सामाजिक तीर्थयात्रा घडली. आपण सर्व या तीर्थयात्रेतील यात्रिक आहोत. आपण सर्वांनी या परिसंवादातील विचारांचा, कार्याचा प्रसार केला पाहिजे. परिसंवादात आलेल्या संस्थांच्या कार्याचा आढावा घेऊन अरुणजी म्हणाले की, "यांतून संवेदनशीलता जागी व्हावी. कार्याची प्रेरणा घेऊन कार्याला प्रारंभ व्हावा. हेच या परिसंवादाचे यश असेल." संपूर्ण वंदे मातरम् ने परिसंवादाचा समारोप झाला.